**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ३०१/२०२३ मधील निशाणी क्र. ५४ वरील आदेश</u>**
**( अरुण पोरजे व इतर विरुध्द नम्रता भुतडा व इतर )**
**( सीएनआर नं. एमएचएनएस२९०००६१०—२०२३ )**

वादी क्र. २ ने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञवली ६ नियम १७ प्रमाणे दाव्यांच्या कथनामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्ज व प्रतिवादी क्र. ५ चे नि. ५६ वरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०३. वादी क्र. १ ने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुद्ध साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेकामी व निरंतर ताकीदीकामी दाखल केला आहे. वादी क्र. २ यापुर्वी दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ६ म्हणुन सामील होत्या. नि. ५० वरील आदेशाप्रमाणे वादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ६ यांना वादी क्र. २ म्हणुन सामील केले आहे. त्याअनुषंगाने व प्रतिवादी क्र. १ ते ४ आणि वादी क्र. २ यांच्यामध्ये असलेल्या तथाकथित व्यवहाराअन्वये वादी क्र. २ ला दाव्याच्या कथनांमध्ये दुरुस्ती करावयाची आहे. त्यासाठी वादी क्र. २ ने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०४. वास्तविक पाहता वादी क्र. १ व २ आणि प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यामध्ये दावा मिळकतीच्या खरेदीविक्री संदर्भाने सन २०१९ मध्ये व्यवहार झाला होता व वादींनी प्रतिवादींना विसारापोटी रक्कम दिलेली आहे. तरीही प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रतिवादी क्र. ५ सोबत दावा मिळकतीचा विक्री व्यवहार केला. त्यामूळे वादी क्र. १ ने प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचेविरुध्द दाखल केला. प्रतिवादी क्र. ६ ने नि. ४० अन्वये कैफियत दाखल करुन वादीचा दावा मान्य केला आणि नि. ५० अन्वये अर्ज दाखल करुन स्वत: वादीपणात सामील करण्याची विनंती केली.

०५. उभयपक्षकारांमधील व्यवहार, दावा आणि कैफियतीमधील कथने आणि प्रस्तुत दुरुस्ती अर्जामधील कथने पाहता दावा मिळकती संदर्भातील व्यवहार

वादी क्र. १ व २ आणि प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेमध्ये झालेला होता असे प्राथमिकदृष्टया दिसून येते. त्यामूळे वादी क्र. २ दाव्यामध्ये करुन मागत असलेली दुरुस्ती ही न्याय्य स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमूळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. नि. ४४ वर निश्चित केलेले मुद्दे पाहता वादी व प्रतिवादी क्र. ६ म्हणजे वादी क्र. २ खरेदीखत करुन मिळण्यास पात्र आहेत का असा मुद्दा निश्चित केला असल्याचे दिसून येते. तसेच वादी क्र. २ करुन मागत असलेली दुरुस्ती मुदहबाहय आहे किंवा कसे याबाबत प्रतिवादींना त्यांचा बचाव मांडण्याची संधी मिळणार आहे. तसेच मुदतीबाबतचा मुद्दा तथ्य व कायदा यांच्या आधारे अंतिम निकालाच्या वेळी विचारात घेणे योग्य राहील. सबब, वादी क्र. २ ने प्रस्तुत अर्जात नमूद केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामधील वादाच्या अंतिम निराकरणाच्या दृष्टिने आवश्यक व गरजेची आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होणे न्यायोचित आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते:

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी आज किंवा कायदेशिर मुदतीमध्ये प्रस्तावित दुरुस्ती करुन घ्यावी, योग्य ते न्यायालयीन शुल्क भरावे व दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.08.12 15:45:29 +0530

स्थळ:— इगतपुरी
दिनांक:— १२/०८/२०२६

( मो. द. ननवरे )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.

मी अशी खात्री देते की, पीडीएफ नस्तीमधील निकालपत्रातील प्रत्येक शब्द हा मुळनिकालपत्रातील मजकुराशी जुळणारा व सुसंगत आहे.

लघुलेखकाचे नांव : श्रीमती व्ही.आर.बलकवडे

न्यायालयाचे नांव : दिवाणी न्यायाधिश व.स्तर, इगतपुरी.

निकालाचा दिनांक :१२/०८/२०२६

निकालपत्रावर पिठासन अधिका—यांनी सही केल्याचा दिनांक : १२/०८/२०२६

निकालपत्र अपलोड केल्याचा दिनांक : १२/०८/२०२६